# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:06.02.2026** **वार:शुक्रवार**

---

१.भारतानं युरोपियन महासंघ आणि अमेरिकेबरोबर केलेल्या व्यापार करारांमुळे जग स्थिरतेच्या दिशेनं पुढं जात असल्याचा जागतिक समुदायामध्ये विश्वास, पंतप्रधानांचं प्रतिपादन

२. रिझर्व्ह बँक आज पतधोरण आढावा जाहीर करणार

३ परीक्षा पे चर्चा उपक्रमांतर्गत पंतप्रधान मोदी आज देशभरातील विद्यार्थ्यांशी साधणार संवाद

३. मेघालयातील खाण दुर्घटनेत १८ जणांचा मृत्यू. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधानांकडून दुःख व्यक्त आणि

४. झिम्ब्वावेतील हरारे इथं आज भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान
१९ वर्षांखालील युवकांच्या क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेचा अंतिम सामना

**<u>पीएमराज्यसभाभाषण</u>**

भारतानं युरोपियन महासंघ आणि अमेरिकेबरोबर केलेल्या व्यापार करारांमुळे जग स्थिरतेच्या दिशेनं पुढे जात असल्याचा जागतिक समुदायामध्ये विश्वास निर्माण झाला आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक ठरावावर राज्यसभेत झालेल्या चर्चेला दिलेल्या उत्तरात पंतप्रधानांनी हे प्रतिपादन केलं. भारत प्रमुख देशांसोबत भविष्यवेधी व्यापार करार करत आहे, या करारांना जगाची स्वीकृती मिळत असून भारतातील युवकांसाठी संधी वाढत आहेत, असं मोदी यावेळी बोलताना म्हणाले. अलीकडच्या काही दिवसांमध्ये नऊ महत्त्वाचे व्यापार करार झाले असून त्यामध्ये युरोपातील २७ देशांचा समावेश असलेल्या युरोपियन महासंघाशी करण्यात आलेल्या कराराला मदर ऑफ ऑल डील्स मानलं जात आहे, असंही त्यांनी नमूद केलं. युरोपियन महासंघासोबत केलेल्या करारामुळे जागतिक समुदायात विश्वासाची भावना निर्माण झाली असून अमेरिकेशी झालेल्या करारामुळे याला गती मिळाली आहे. हे दोन्ही करार जगाच्या दृष्टीनं सकारात्मक संकेत असून त्यांचा सर्वाधिक लाभ तरुणांना होणार आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

तत्पूर्वी लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारदर्शक ठराव आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आला. राष्ट्रपतींनी २८ जानेवारीला संसदेच्या दोन्ही सभागृहाला संबोधित केलं होतं. भाजपाचे खासदार सर्बानंद सोनोवाल यांनी आभारदर्शक ठराव मंजुरीसाठी मांडला त्याला तेजस्वी सूर्या यांनी अनुमोदन दिलं. विरोधी पक्षांनी विविध मुद्द्यांवरून केलेल्या घोषणाबाजीमुळे लोकसभेचं कामकाज काल दिवसभरासाठी तहकूब होण्याआधी तीनवेळा तहकूब झालं होतं.

**आरबीआयपतधोरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्यावतीनं द्वैमासिक पतधोरण आढावा बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची आज घोषणा करण्यात येणार आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली बुधवारपासून सुरू झालेल्या सहा सदस्यांच्या पतधोरण समितीच्या बैठकीत भारतीय अर्थव्यवस्था, चलनफुगवटा यांसह अन्य अनेक आर्थिक घटकांवर चर्चा करण्यात आली. २०२५-२६ या आर्थिक वर्षातील हा शेवटचा पतधोरण आढावा आहे. रिझर्व्ह बँकेनं गेल्या वर्षीच्या फेब्रुवारीपासून रेपो दरात एकंदर सव्वा टक्के कपात केली आहे.

**पीपीसी**

परीक्षा पे चर्चा या उपक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी १० वाजता देशभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. विविध मंचांद्वारे या चर्चेचं थेट प्रसारण करण्यात येणार आहे. या वार्षिक उपक्रमातील हा नववा संवाद आहे. परीक्षेच्या काळात तणावमुक्त राहून अभ्यासावर अधिक चांगल्या प्रकारे मन एकाग्र करण्यास विद्यार्थ्यांना मदत व्हावी यावर चर्चेचा मुख्य भर असणार आहे. यावर्षी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मायजीओव्ही पोर्टलवर साडेचार कोटींहून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी नावनोंदणी केली आहे. यावर्षी पंतप्रधान नवी दिल्लीशिवाय देवमोगरा, कोइमतूर, रायपूर, गुवाहाटी इथल्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांशीही चर्चा करणार आहेत.

**सेशेल्सअध्यक्ष-**

सेशेल्सचे अध्यक्ष डॉ. पॅट्रिक हर्मिनी सध्या पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले असून ते सध्या चेन्नई इथं आहेत. ते आज तामिळनाडूचे राज्यपाल आर.एन. रवी यांची भेट घेऊन चर्चा करील. त्यानंतर ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत द्विपक्षीय चर्चा करण्यासाठी नवी दिल्लीला जातील. भारत आणि सेशेल्स दरम्यानच्या संबंधांचं यंदा सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्यानिमित्त डॉ. हर्मिनी सपत्नीक भारत भेटीवर आहेत.

**युएसइराण**

अमेरिका आणि इराण यांच्यात आज आण्विक मुद्द्यावर ओमानची राजधानी मस्कत इथं थेट चर्चा होणार आहे. वाढत्या प्रादेशिक तणावाच्या पार्श्र्वभूमीवर या चर्चेला अत्यंत महत्त्व प्राप्त झालं आहे. या चर्चेचं स्थळ, स्वरुप आणि कार्यक्रम पत्रिका यासंबंधी बऱ्याच दिवसांच्या अनिश्चिततेनंतर अखेर आज भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी साडेअकरा वाजता ही चर्चा सुरू होणार आहे

**शहाजम्मूकाश्मीर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह काल दोन दिवसांच्या जम्मू आणि काश्मिरच्या दौऱ्यावर काल रात्री जम्मू विमानतळावर पोहोचले. जम्मूमध्ये ते सीमा सुरक्षिततेचा आढावा घेणार असून, केंद्रशासित प्रदेशांच्या सुरक्षितता परिस्थितीवर आधारित एका उच्चस्तरीय बैठकीला उपस्थित राहाणार आहेत. या दौऱ्यात

सुरक्षितता यंत्रणा आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन एकंदर कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीचे मूल्यांकन तसंच प्रदेशात सुरू असलेल्या विकास कामांच्या प्रगतीचा आढावा घेतील.

**भारत टॅक्सी**

केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी काल नवी दिल्लीत 'भारत टॅक्सी या ॲप-आधारित परिवहन सेवेचं उदघाटन केलं. 'भारत टॅक्सी हा भारताचा पहिला सहकारी तत्वावर चालवण्यात येणारा राईड-हेलिंग प्लॅटफॉर्म असून त्याची २००२ च्या भारतीय संस्था नोंदणी कायद्यांतर्गत नोंदणी करण्यात आली असल्याचं सहकार मंत्रालयानं म्हटलं आहे. ही सेवा पुरवण्यासाठी कोणत्याही प्रकारचं कमिशन आकारलं जाणार नसून भाडेवाढही केली जाणार नाही. भारत टॅक्सीच्या उपक्रमातून मिळणारा नफा भारत टॅक्सी चालकांना वितरित केला जाणार असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. ही सेवा पुरवणाऱ्या चालकाला सारथी म्हणून संबोधलं जाणार आहे.

**होळीरेल्वेगाड्या**

भारतीय रेल्वेनं यावर्षी होळीच्या दिवसांमध्ये विक्रमी संख्येनं विशेष गाड्या चालवण्यात येणार असल्याचं जाहीर केलं आहे. होळीच्या सणाच्या काळात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन त्यांना विनासायास आणि सुरळितपणे प्रवास करता यावा यासाठी देशभरात चौदाशेहून अधिक होळी विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत. ही संख्या १५शे पर्यंत जाण्याचीही शक्यता आहे. देशातील प्रमुख, जास्त वर्दळीच्या स्थानकांवरून या विशेष गाड्या चालवण्यात येतील.

**मेघालयस्फोट**

मेघालयमध्ये पूर्व जैतिया हिल्स जिल्ह्यातील थांगस्को परिसरातल्या कोळसा खाणीत झालेल्या स्फोटात १८ लोकांचा मृत्यू झाला आहे. अजूनही काही जण खाणीत अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहेत. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, खाणकामासाठी वापरल्या जाणाऱ्या शक्तिशाली स्फोटकांच्या स्फोटामुळे बोगदा कोसळल्याने ही दुर्घटना घडली. स्फोटाच्या तीव्रतेमुळे खाणीजवळच्या इमारती कोसळल्यानं बचाव कार्यात अडथळा येत असल्याचं स्थानिक सूत्रांनी सांगितलं. यामध्ये बचावलेल्या व्यक्तीची प्रकृती गंभीर आहे. ही खाण बेकायदेशीर असल्याचं आणि खाणकामासंदर्भातील स्थानिक सरकारी आदेशांचं उल्लंघन करून ती चालवण्यात येत होती असं प्राथमिक तपासात आढळलं आहे. दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांवरील संदेशातून ही घटना दुःखद असल्याचे सांगून मृतांच्या नातेवाईकांना राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपयांची तर जखमींना प्रत्येकी पन्नास लाख रुपयांच्या मदतीची घोषणा केली आहे. तर मुख्यमंत्री कॉनरॉड संगमा यांनी घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घटनास्थळी राष्ट्रीय आपत्ती दलाची दोन पथके रवाना केल्याची माहिती समाज माध्यमांवरील संदेशाद्वारे दिली आहे.

**बॅडमिंटन**

आशिया सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत, गतविजेत्या भारतीय महिला संघाचा सामना आज उपांत्यपूर्व फेरीत यजमान चीनच्या संघाशी होणार आहे. तर पुरुष संघाचा सामना दक्षिण कोरियाच्या संघाबरोबर होणार आहे. अंतिम गट सामन्यात पुरुष आणि महिला संघाला अनुक्रमे जपान आणि थायलंडकडून पराभव पत्कारावा लागला तरीही भारतीय संघानं अंतिम आठमध्ये प्रवेश केला आहे.

**<u>नेमबाजी</u>**

नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या सम्राट राणा आणि सुरुची सिंग यांनी काल १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात रौप्य पदक पटकावलं. मिश्र सांघिक गटात चिनी तैपेईच्या खेळाडूंनी सुवर्णपदक तर उझबेकिस्तानच्या खेळाडूंनी कास्यपदक मिळवलं. या विजयासह भारताच्या वरिष्ठ गटाची पदकसंख्या पाच झाली आहे. यात दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि एका कास्य पदकाचा समावेश आहे.

**<u>अंडर१९विश्वचषक</u>**

१९ वर्षांखालील युवकांच्या क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान खेळला जाणार आहे. झिम्बाब्वेमधील हरारे इथल्या मैदानावर दुपारी १ वाजता होणारा हा सामना सुरू होईल. हरारे इथे परवा म्हणजे बुधवारी झालेल्या उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात भारतानं अफगाणिस्तानचा सात गडी राखून पराभव करून अंतिम फेरी गाठली होती. तर इंग्लंडने बुलावायो इथं झालेल्या उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा २७ धावांनी पराभव केला. भारतीय संघ या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिला आहे. तसंच, आतापर्यंत सर्वाधिक ५ वेळा विश्वचषक जिंकण्याचा विक्रमही भारताच्याच नावावर आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**